
|| अप्पो दीपो भव ||

महात्मा गांधी मिशन विश्वविद्यालय

**MGMUNIVERSITY**

ESTABLISHED BY MAHARASHTRA ACT NO.XXXVI OF 2019



# वार्षिक अहवाल

## २०१९-२०

॥ अप्पो दीपो भव ॥
महात्मा गांधी मिशन विश्वविद्यालय
MGM UNIVERSITY

## वार्षिक अहवाल संपादकीय मंडळ

**डॉ. आशिष गाडेकर, अध्यक्ष**
**कर्नल (डॉ.) प्रदीप कुमार, सदस्य**
**डॉ. रेखा शेळके, सदस्य**
**डॉ. परमिंदर कौर, सदस्य**
**डॉ. अभिजीत ठाकूर, सदस्य**
**श्रीमती अपूर्वा सोळंके, सदस्य**
**श्रीमती प्रेरणा दळवी, समन्वयक**

## वार्षिक अहवाल द्वारा प्रकाशित


**डॉ. आशिष गाडेकर,**
**कुलसचिव, एमजीएम विद्यापीठ**

एम. जी. एम. विद्यापठ, एम. जी. एम. कॅम्पस, एन-६, सिडको, औरंगाबाद - ४३१००३, महाराष्ट्र, भारत.
फोन: ०२४०-६४८१००० ई-मेल: registrar@mgmu.ac.in | www.mgmu.ac.in

# वार्षिक अहवाल
# २०१९-२०

## ९ सप्टें. २०१९ - ३० जून २०२०

|| अप्पो दीपो भव ||
महात्मा गांधी मिशन विश्वविद्यालय
MGM UNIVERSITY



सातत्यपूर्ण चिकित्सा आणि निरोगी जिज्ञासा कोणत्याही प्रकारचे ज्ञान मिळविण्याची पूर्वअट आहे.

*– महात्मा गांधी*

अध्यक्षांचे मनोगत

कुलपतींचे मनोगत

कुलगुरूंचे मनोगत

कुलसचिवांचे मनोगत



# विषय


| अनु. क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | एमजीएम विद्यापाठाबद्दल | ०१ |
| १. | विद्यापीठाची उद्दिष्टे | ०९ |
| २. | विद्यापीठाचे अधिकार आणि कार्ये | १० |
| ३. | ऑर्गेनोग्राम | ११ |
| ४. | विद्यापीठाचे अधिकारी | १३ |
| ५. | विद्यापीठाचे पदाधिकारी | १४ |
| ६. | शैक्षणिक कार्यक्रम | १९ |
| ७. | विद्यापीठ प्रवेश | २० |
| ८. | विद्यार्थी उपक्रम | २१ |
| ९. | विद्यार्थ्यांचे यश | ३० |
| १०. | इंडस्ट्री अकॅडेमिया-ॲल्युमनाय कनेक्ट प्रोग्राम | ३१ |
| ११. | प्राध्यापकांचे यश | ३४ |
| १२. | संशोधन आणि विकास | ३५ |
| १३. | मान्यवरांशी संवाद | ३६ |
| १४ | देण्यात आलेली शिष्यवृत्ती | ४० |
| १५. | अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमता आणि प्रवेश | ४१ |
| १६. | अभ्यासक्रमनिहाय शुल्क संरचना आणि संकलन | ४२ |
| १७. | विद्यापीठ कर्मचारी वेतन | ४३ |
| १८. | अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | ४४ |
| १९. | राज्य आणि वर्गनिहाय विद्यार्थी प्रवेश | ४५ |

# लघुरूपे

| | |
|---|---|
| UGC | विद्यापीठ अनुदान आयोग |
| IOMR | इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च |
| IBT | इन्स्टिट्यूट ऑफ बायो-सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी |
| CJMC | पत्रकारिता आणि जनसंवाद महाविद्यालय |
| IHM | इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट |
| IFD | इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझायनिंग |
| CFA | ललित कला महाविद्यालय |
| ISS | सामाजिक विज्ञान संस्था |
| IIFL | भारतीय आणि परदेशी भाषा संस्था |
| GYP-CCSIT | डॉ. जी. वाय. पाथ्रीकर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी |
| DoP | फोटोग्राफी विभाग |
| B.Tech. | बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी |
| B.Arch. | बॅचलर ऑफ आर्किटेक्चर |
| B.Des. | बॅचलर ऑफ डिझाईन |
| BCA | बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन |
| B.Sc. | बॅचलर ऑफ सायन्स |
| BPA | बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्‌स |
| BFA | बॅचलर ऑफ फाईन आर्ट्‌स |
| BBA | बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन |
| B.Com. | बॅचलर ऑफ कॉमर्स |
| M.Tech. | मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी |
| MFA | मास्टर ऑफ फाईन आर्ट्‌स |
| M. Arch. | मास्टर ऑफ आर्किटेक्चर |
| M.Sc. | मास्टर ऑफ सायन्स |
| M. Des. | मास्टर ऑफ डिझाईन |
| MCA | मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन |
| MA | मास्टर ऑफ आर्ट्‌स |
| MPA | मास्टर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्‌स |
| MBA | मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन |
| MSW | मास्टर ऑफ सोशल वर्क |
| NASSCOM | नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपन्या |
| MEITY | मिनिस्ट्री ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी |



# अध्यक्षांचे मनोगत



शिक्षणाचे उद्दिष्ट हे केवळ माहिती पुरविणे नसून अशा चारित्र्याची निर्मित करणे आहे. जे राष्ट्राचे भविष्य घडवेल. गांधीवादी मूल्यांच्या भक्कम पायावर उभे राहून आणि नेहरूंच्या दृष्टीचे व्यापक पंख लावून, एमजीएम विद्यापीठ या राष्ट्राचे चारित्र्य निर्माणासाठी प्रयत्नशील आहे. उच्च शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे जी आपल्या दृष्टिकोनात बदल घडवून आणते आणि आपल्याला वैज्ञानिक दृष्टीकोनासह नवीन विचार, नवीन दृष्टी आणि नवीन महत्त्वकांक्षा देते.

एमजीएम विद्यापीठाची स्थापना २०१९ मध्ये महात्मा गांधी मिशन ट्रस्टद्वारे करण्यात आली. विद्यापीठाची स्थापना झाल्याबरोबर अल्पावधीतच कोविड महासाथीचे आव्हान उभे राहिली. अशा परिस्थितीतही विद्यापीठाने उल्लेखनीय यश संपादन केले. आमच्या विविध घटक महाविद्यालयांच्या माध्यमातून विविध विषयांतील अत्याधुनिक आणि जीवन समृद्ध करणारे अनेक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. राज्यच नव्हे तर संपूर्ण देशातील सवोत्कृष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये या महाविद्यालयांनी स्थान मिळवले आहे.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रालाही उदयोन्मुख स्पर्धेला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी आणि उपलब्ध संधींचे सोने करण्यासाठी स्वतःला पुनर्सज्ज करण्याची गरज जाणवली. या नवीन आव्हानांवर कालच्या संकल्पना, धोरणे आणि तंत्रज्ञान यांनी मात करता येणार नाही. त्याऐवजी भविष्यवेधी विचार आणि त्यानुरूप धोरण आखून आजचा कृती आराखडा तयार करावा लागेल. या गरजेची पूर्तता करण्यासाठीच परिपूर्णतेचा ध्यास घेतलेली, मूल्याधारित जीवन जगणारी आणि जागतिक दृष्टिकोन बाळगणारी पिढी घडविण्यास आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

२१व्या शतकातील वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचा लाभ घेण्याची मोठी क्षमता भारतीय तरुणांमध्ये आहे. या नवोदित भारतीय प्रतिभेला योग्य प्रकारचे प्रशिक्षण आणि सुविधा पुरवून एमजीएम विद्यापीठ शिक्षण, संशोधन आणि नवप्रवर्तनाला साहाय्य करीत आहे. अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र, डिझाईन, कला, सामाजिक विज्ञान, मूलभूत व उपयोजित विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन अशा सर्वच शाखांत आमचे विद्यार्थी यशस्वी अशी कामगिरी करीत आहेत, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. एमजीएम नेहमीच असे विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करते. जे आपापल्या क्षेत्रात कर्तृत्त्वाचा ठसा उमटवताना केवळ शैक्षणिकदृष्ट्याच नव्हे तर नैतिकदृष्ट्याही आदर्श प्रस्थापित करतील.

एमजीएम विद्यापीठ असे व्यावहारिक, उद्योगाभिमुख आणि भविष्यवेधी उच्च शिक्षण प्रदान करण्यास कटिबद्ध आहे. जे भारताच्या सर्व राज्यांतील तसेच परदेशातील मुख्यत्त्वे विकसनशील देशांतील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना आकर्षित करेल आणि 'भावी पिढ्यांच्या सक्षमीकरणातून राष्ट्रांचे सक्षमीकरण' या ब्रीदवाक्याला सार्थक ठरवेल.

**– श्री. कमलकिशोर कदम**
अध्यक्ष, महात्मा गांधी मिशन

# कुलपतींचे मनोगत



आज अभूतपूर्व बदल, अनिश्चितता आणि अपरिहार्य संपर्क यांनी युक्त अशा जगात आपण राहत आहोत. अशा परिस्थितीत उच्च शिक्षण क्षेत्राची जबाबदारी ही केवळ ज्ञाननिर्मितीपर्यंतच मर्यादित राहू शकत नाही, तर वर्तमानातील जटील सामाजिक-आर्थिक समस्यांवर मार्ग काढणे हे देखील या क्षेत्राचे कर्तव्य ठरते. ज्ञान व कृती यांत विसंगतता आढळून येत असताना तर ही जबाबदारी आणखीनच वाढते. यामुळे संशोधनात बहुशास्त्रीय दृष्टिकोन अंगीकारणे आवश्यक आहे. एकीकडे ज्ञाननिर्मिती आणि दुसरीकडे प्राप्त ज्ञानाचा वापर करून सामाजिक समस्या सोडविणे यांच्यातील तफावत दूर करणे हे उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांचे उद्दिष्ट असले पाहिजे. याच ध्येयाने प्रेरित होऊन आणि ६७ शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि गुरुकुलचा गुणवत्तापूर्ण वारसा पुढे नेत एमजीएम समूहाने औरंगाबाद येथे एमजीएम विद्यापीठाची स्थापना केली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १५०व्या जयंती वर्षात स्थापन झालेले हे विद्यापीठ त्यांच्याच मूल्यांचा वारसा पुढे नेण्यास कटिबद्ध आहे.

मागील वर्षी कोविड-१९च्या उद्रेकाने जीवनाची सर्वच क्षेत्रे विस्कळीत झाली होती. दीर्घ काळासाठी शाळा आणि महाविद्यालये बंद राहिल्याने या काळात शिक्षण क्षेत्राचे आतोनात नुकसान झाले. परंतु या अभूतपूर्व संकटकाळातही शिकण्या आणि शिकवण्याच्या नवनवीन पद्धती आत्मसात करून आमच्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण थांबणार नाही याची काळजी घेतली. याचा मला मनापासून आनंद वाटतो.

अशीच आणखी एक आनंदाची बाब म्हणजे मागील वर्षी एमजीएम विद्यापीठाने अनेक नामांकित आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांशी साधलेले सहकार्य करार. यातून जागतिक पातळीवरील उत्तमोत्तम ज्ञान आणि तंत्रज्ञान आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत होईल. एमजीएम विद्यापीठाला मिळालेले अनेक मानसन्मान आणि पुरस्कारांमधून विद्यापीठाची शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि स्त्रीपुरुष समानता या बाबतीतील वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

एमजीएम विद्यापीठाचा गांधीवादी तत्त्वज्ञानावर अतूट विश्वास आहे आणि याच विश्वासाच्या बळावर विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षण पुरवत राहील, ज्या आधारे ते स्वतःसाठी आणि आपल्या देशासाठीही एक उज्ज्वल भविष्य घडवतील.

**– श्री. अंकुशराव कदम**
कुलपती, एमजीएम विद्यापीठ

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक ११५(२)] बुधवार, ऑगस्ट २१, २०१९/श्रावण ३०, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २७८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट २०१९.

**अधिसूचना**

**एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद अधिनियम, २०१९.**

क्रमांक स्वअवि–२०१८/प्र.क्र. ७९/विशि-४.—" एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद " अधिनियम, २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६) याच्या कलम १, पोट-कलम (२) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक २० ऑगस्ट, २०१९ हा दिनांक अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक म्हणून नियत करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सौरभ विजय,**
शासनाचे सचिव.

*NOTIFICATION*

MGM UNIVERSITY, AURANGABAD ACT, 2019.

No.SFU-2018/C.R. 79/Uni.4.—In exercise of the power conferred by sub-section (*2*) of section 1 of the MGM University, Aurangabad Act, 2019 (Mah. Act No. XXVI of 2019), the Government of Maharashtra hereby appoints the 20th August, 2019 to be the date on which the said Act shall come into force.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SAURABH VIJAY,
Secretary to the Government.

# एमजीएम विद्यापीठाविषयी

'सुप्त शक्तीच्या बळावर तुम्ही जग जिंकू शकता', महात्मा गांधींच्या या तत्त्वज्ञानावर आधारित एमजीएम ट्रस्टची स्थापना १९८२ साली माजी शिक्षण मंत्री श्री. कमलकिशोर कदम आणि इतर अभ्यासक व दूरदर्शी सदस्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. एमजीएम ट्रस्टने आपली पहिली शैक्षणिक संस्था, अजंठा-एलोरासारखा समृद्ध ऐतिहासिक वारसा बाळगणाऱ्या परंतु उत्कृष्ट शैक्षणिक सुविधांचा अभाव असलेल्या, औरंगाबाद शहरात स्थापन केली. मागील जवळपास चार दशकांत, महात्मा गांधी मिशनने गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवेचा झळाळता इतिहास निर्माण केला आहे. आधुनिक जगाच्या बरोबरीने चालणारी एक मजबूत आणि गतिशील संस्था, शहरातील मध्यवर्ती ठिकाण आणि उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा यांमुळे विद्यार्थ्यांसाठी एमजीएम एक सार्थ निवड ठरते आहे. ही संस्था विद्यार्थ्यांना आपल्या पायावर उभे करणारे शिक्षण देण्यास पूर्णपणे कटिबद्ध आहे. 'सक्षम चारित्र्य घडविण्यास कुचकामी असलेले शाब्दिक शिक्षण हे पूर्णपणे निरर्थक आहे.' या विचारावर दृढ विश्वास ठेऊन एमजीएम विद्यापीठ वाटचाल करीत आहे.

मागील तीन वर्षांत १३ स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे नव्याने स्थापन झाली आहेत. औरंगाबादच्या एमजीएम विद्यापीठाची स्थापना महात्मा गांधी मिशन ट्रस्टद्वारे करण्यात आली असून महाराष्ट्र शासनाने 'एमजीएम विद्यापीठ, महाराष्ट्र अधिनियम क्र. २६' अंतर्गत विद्यापीठाला मान्यता दिली आहे. ही अधिसूचना महाराष्ट्र विधानसभा आणि महाराष्ट्र विधान परिषदेद्वारे जुलै २०१९ मध्ये पारित होऊन २२ जुलै २०१९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे. 'एमजीएम विद्यापीठ अधिनियम, २०१९' हा २० ऑगस्ट २०१९ पासून लागू झाला असून ९ सप्टेंबर २०१९ पासून तो अंमलात आहे. मराठवाड्याच्या उच्च शिक्षणाच्या इतिहासात ही एक अत्यंत महत्त्वाची उपलब्धी आहे. महाराष्ट्र राज्याच्या या भागातील हे पहिलेच स्वयं-अर्थसहाय्यित (खाजगी) विद्यापीठ आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक उपक्रमांना सुरुवात केली. अत्यंत सक्षम आणि समर्पित प्राध्यापक वृंद, तत्पर व्यवस्थापकीय कर्मचारी, आधुनिक पायाभूत सुविधा आणि घटक महाविद्यालयांतील माजी विद्यार्थ्यांचे जागतिक जाळे, या शक्तिस्थानांमुळे एमजीएम विद्यापीठातील विद्यार्थ्यांना येथे शिक्षण घेताना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांच्या तोडीचा अनुभव मिळणार आहे.

एमजीएम विद्यापीठात सहा विद्याशाखा आहेत - अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि वाणिज्य, मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, सामाजिक विज्ञान आणि मानव्यविद्या, प्रायोगिक कला आणि शिक्षणशास्त्र. विविध महाविद्यालये, शैक्षणिक केंद्रे आणि गुरुकुल यांना परस्पर संबंधित विद्याशाखेखाली एकत्रित आणण्यासाठी या सहा शाखांची निर्मिती करण्यात आली आहे.



## आमचे ध्येय

- स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण समाजाच्या निर्मितीसाठी शाश्वत मनुष्य विकासाला चालना देणे.
- सामुदायिक सेवा, समाजकल्याण आणि भारतीय वारसा व संस्कृतीशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन देणे.
- विपश्यना आणि गांधीवादी तत्त्वज्ञान यांच्या प्रसारातून समाजात अहिंसा आणि सत्याची रुजवण करणे.
- समाजात साधी राहणी आणि उच्च विचारसरणीची संस्कृती रुजवणे.

## आमची उद्दिष्टे

- आधुनिक शिक्षण, संशोधन, नवप्रवर्तन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे आदर्श शैक्षणिक केंद्र प्रस्थापित करणे.
- व्यक्तींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासू आणि चौकस वृत्ती विकसित करणे
- आंतरशाखीय शिक्षण आणि उपक्रमांवर भर देणे.
- व्यावसायिक तसेच वैयक्तिक जीवनातही अत्युच्च नीतिमत्ता आणि नैतिक मूल्यांप्रती अतूट संवेदनशीलता निर्माण करणे.
- भारताचा समृद्ध वारसा आणि कलेशी संबंधित शिक्षण प्रदान करणे आणि त्याद्वारे आपल्या प्राचीन ज्ञान-विज्ञानाचे संवर्धन करणे.
- जीवन समृद्ध करणाऱ्या आणि व्यापक दृष्टिकोन देणाऱ्या आंतरशाखीय शिक्षणाला चालना देणे.
- समानुभूती, समाज सेवा आणि समाजाप्रती संवेदनशीलता ही मानवी स्वभावाची नैसर्गिक अंगे असतील अशा वातावरणाची निर्मिती करणे.
- विद्यार्थ्यांना 'नवीन आर्थिक व्यवस्थेत' काम करण्यास सक्षम करणे आणि भारताला जागतिक स्तरावर 'अभिमानाचे स्थान' मिळवण्यास मदत करणे.

# विद्यापीठ गीत

अत्त दिप भव भव प्रदिप भव
स्वरुप रुप भव हो
ज्ञान सब्ब विज्ञान सब्ब भव
सब्ब दीप भव हो

अत्ताहि अत्त नो नाथो
अत्ताहि अत्त नो गति

अत्त मार्गपर अप्रमादसे है तुझे चलना
सब्ब का कल्याण हो, वो कार्यकुशल करना
सब्ब का उत्तम मंगल,पथप्रदर्शक हो

अत्त दिप भव भव प्रदिप भव
स्वरुप रुप भव हो
ज्ञान सब्ब विज्ञान सब्ब भव
सब्ब दीप भव हो

बुद्धं शरणं गच्छामि :
धम्मं शरणं गच्छामि :
संघं शरणं गच्छामि :












एमजीएम विद्यापीठाच्या नाममुद्रा (लोगो) अनावरण प्रसंगीची काही क्षणचित्रे







## एमजीएम विद्यापीठाच्या नाममुद्रेचे (लोगो) महत्त्व

काठीचे एक टोक धरून गांधीजींच्या पुढे चालणारे एक लहान मूल महात्मा गांधीजींना मार्ग दाखवत आहे. आतापर्यंत गांधीजी आपल्याला मार्ग दाखवत होते, आज नवी पिढी आपले मार्गदशन करीत आहे. 'चरखा' या शब्दाची व्युत्पत्ती 'चक्र' या शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ 'चक्र', 'चाक' किंवा कालचक्र असा होतो. चरखा जगाच्या वाहण्याचा वेग, निसर्गाच्या लयीवर चालणारा वेळ आणि सर्व रचनात्मक संकल्पनांचा स्रोत दर्शवतो.

चरखा किंवा सूतकताई यंत्र हे महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमाचे भौतिक प्रतीक होते. स्वदेशी, स्वयंपूर्णतेचे प्रतिक असलेला चरखा परस्परावलंबित्वाचेही प्रतिनिधित्व करतो कारण तो कापूस उत्पादक, विणकर, वितरक आणि वापरकर्ते या सर्वांच्याच केंद्रासाठी आहे. चरखा हे कापसाच्या तंतूपासून धागा किंवा सूत काढण्याचे यंत्र आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वी कापूस वस्त्रोद्योगाची ती मूलभूत गरज होती. औद्योगिक क्रांतीच्या काळात चरख्याची जागा घेणाऱ्या कताई यंत्र आणि कताई चौकटीसारख्या यंत्रांचा पायाही चरख्यानेच रचला होता. कापूस उद्योग हा आपला प्रथम उद्योग होता. यात प्रत्येक माणूस हा स्वयंपूर्ण होता, कारण तो कापूस विणत होता, कपडे तयार करत होता आणि ते परिधानही करीत होता.


## अप्पो दीपो भव - *स्वतःच स्वतःचे मार्गदर्शक व्हा*

हे बुद्धाचे अंतिम शब्द होते, त्यांनी आपल्या शिष्यांचा निरोप घेताना दिलेला अंतिम संदेश होता. एका बौद्ध कथेनुसार, आनंद हे बुद्धांचे मुख्य शिष्य होते. ते बेचाळीस वर्षांपासून प्रबुद्धांसोबत त्यांच्या सावलीप्रमाणे दिवसरात्र राहत होते. तरीही या मर्त्य जगातील बुद्धांच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांना ज्ञानप्राप्ती झाली नव्हती. त्यामुळे जेव्हा बुद्ध या जगाचा निरोप घ्यायला लागले, तेव्हा आनंद रडायला लागले आणि म्हणाले, ज्ञानप्राप्तीच्या या प्रवासात तुम्हीच माझे आणि आमच्या सर्वांचे गुरू आणि मार्गदर्शक आहात. मला माहित आहे की, मला अजूनही ज्ञानप्राप्ती झालेली नाही. तेव्हा बुद्ध आनंदले म्हणाले, रडू नकोस, 'अप्पो दीपो भव', अर्थात स्वतःच स्वतःचा मार्गदर्शक हो. दुसरा कोणीही तुला ज्ञानप्राप्ती करून देऊ शकत नाही. तू स्वतःच स्वतःचा उद्धार करू शकतो. आपण सर्वांनीच आपल्यातच दडलेल्या या दिव्य ज्ञानाकडे वाटचाल करायला हवी. बुद्ध स्वानुभवातून या निष्कर्षाप्रत पोहोचले होते. या आधुनिक युगात, याला 'माइंडफुलनेस' असेही म्हणतात जे आपल्याला आधीच अस्तित्वात असलेल्या सत्याविषयी क्षणोक्षणी जागृत राहण्यास मदत करते. वर्तमानात जे काही घडत आहे, मग ते काहीही असो, त्यात जागृत राहायला ते आपल्याला शिकवते.

स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण समाजाच्या निर्मितीसाठी शाश्वत मनुष्य विकासाला चालना देणे हे एमजीएम विद्यापीठाचे ध्येय असून समानुभूती, समाजसेवा आणि समाजाप्रती संवेदनशीलता ही मानवी स्वभावाची नैसर्गिक अंगे असतील अशा वातावरणाच्या निर्मितीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमच्या विद्यार्थ्यांना 'नवीन आर्थिक व्यवस्थेत' काम करण्यास सक्षम करण्यास आणि भारताला जागतिक स्तरावर 'अभिमानाचे स्थान' मिळवण्यास मदत करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

# एमजीएम विद्यापीठाची स्थापना

## एमजीएम ट्रस्ट




ESTABLISHED BY MAHARASHTRA ACT NO.XXXVI OF 2019

# १. विद्यापीठाची उद्दिष्टे


- लिबरल आर्ट्स, मानवविद्या, सामाजिक विज्ञान, जैविक विज्ञान, जैवतंत्रज्ञान, नॅनो-विज्ञान याबोरोबरच तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, बिझनेस अँड कॉमर्स, अप्लाइड अँड क्रिएटिव्ह आर्ट्स, व्यावसायिक शिक्षण, मीडिया, माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान आणि त्यांचा विकास यांसारख्या विद्या शाखांतील शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, क्षमता बांधणीसह उच्च आणि तांत्रिक शिक्षण पुरवणे.
- कला, क्रीडा, संस्कृती, चित्रपट, अंतराळ तंत्रज्ञान, सागरी संशोधन या विषयातील उच्च आणि तंत्रशिक्षण प्रदान करणे तसेच संशोधनासाठी तरतुद करणे.
- उच्च दर्जाच्या बौद्धिक क्षमता विकासासाठी उच्च स्तराच्या संज्ञानात्मक, भावनिक आणि मनोकारक क्षमता निर्माण करणे.
- सामाजिक पुनर्रचना आणि परिवर्तनाचे नवीन मार्ग शोधण्यासाठी नवीन शैक्षणिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सर्जनशीलता, नवप्रवर्तन आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे.
- शिक्षण आणि विकासासाठी अत्याधुनिक सुविधा स्थापन करणे.
- गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांसह शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे
- विज्ञान-तंत्रज्ञान आणि सामाजिक-आर्थिक विकास विषयात संशोधन आणि ज्ञानप्रसारासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करणे.
- आधुनिक आणि अत्याधुनिक प्रक्रिया, यंत्रणा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करून २१व्या शतकातील व्यक्ती आणि समाजाला शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, मूल्यमापन, व्यवस्थापन सेवा देणे तसेच सामाजिक, आर्थिक संपत्ती निर्मिती करणे.
- उद्योग, सार्वजनिक संस्था व समाजाला व्यावसायिक आणि विकास सेवा प्रदान करणे.
- देश तसेच विदेशातील उच्च शिक्षण आणि संशोधन संस्थांशी सहकार्य, समन्वय आणि भागीदारी प्रस्थापित करणे.
- परीक्षा किंवा इतर मूल्यांकन पद्धतींच्या आधारावर पदवी, पदविका, प्रमाणपत्र आणि इतर शैक्षणिक अभ्यासक्रम स्थापित करणे.
- सर्जनशीलता आणि उद्योजकता रुजवण्यासाठी शैक्षणिक रचना, अध्ययन कालावधी आणि सातत्यपूर्ण मूल्यांकनाच्या नाविन्यपूर्ण पद्धती स्थापित करणे.
- शासनाने सुचविलेल्या इतर उद्दिष्टांची अंमलबजावणी करणे.
- विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमाचा दर्जा हा नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन अधिनियम, १९९३ अंतर्गत प्रस्थापित ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन किंवा नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन किंवा विद्यापीठ अनुदान आयोग, अधिनियम १९५६ अंतर्गत प्रस्थापित विद्यापीठ अनुदान आयोग किंवा फार्मसी अधिनियम, १९४८ अंतर्गत प्रस्थापित फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१ अंतर्गत प्रस्थापित बार कौन्सिल ऑफ इंडिया किंवा इतर संबंधित वैधानिक संस्थांद्वारे निश्चित करण्यात आलेल्या दर्जापेक्षा कमी नसेल याची खात्री करणे.

# २. विद्यापीठाचे अधिकार आणि कार्ये

- सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन करण्यासाठी पारंपरिक तसेच ऑनलाईनसारख्या नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतींचा अवलंब करण्यासाठी तरतूद करणे.
- पदवी, पदविका, प्रमाणपत्रे, पुरस्कार, ग्रेड, क्रेडिट्स आणि इतर शैक्षणिक उपाधी प्रस्थापित आणि प्रदान करणे.
- परीक्षांचे आयोजन आणि अंमलबजावणी करणे.
- इतर मान्यताप्राप्त विद्यापीठे, मंडळे किंवा परिषदांद्वारे मान्यताप्राप्त पदवी, पदविका, प्रमाणपत्र इत्यादींना समकक्ष पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर अभ्यासक्रम पुरवणे.
- कॅम्पस उभारण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करणे.
- केंद्रीय ग्रंथालय, विभागीय ग्रंथालये, संग्रहालये आणि संबंधित बाबींची स्थापना करणे.
- विहित मानद पदवी प्रस्थापित आणि प्रदान करणे.
- विशिष्ट प्रकारच्या फेलोशिप, शिष्यवृत्ती, विद्यावेतन आणि फी-माफी योजना प्रस्थापित आणि प्रदान करणे.
- समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाला शैक्षणिक सुविधा प्रदान करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे.
- क्रीडा आणि इतर अभ्यासेतर उपक्रमांना प्रोत्साहन आणि चालना देणे.
- तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर आवश्यक पदांची निर्मिती आणि नेमणुका करणे.
- परस्पर स्वीकारार्ह अटी आणि शर्तींवर आधारित संशोधन प्रकल्प हाती घेणे.
- सल्ला सेवा प्रदान करणे.
- कायद्यातील तरतुदींनुसार विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कायदे, अध्यादेश आणि नियम-विनियम तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे.
- विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे.
- राज्य शासन, भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या सूचनेनुसार देश-विदेशातील इतर विद्यापीठांशी परस्पर सामंजस्याच्या आधारावर दुहेरी पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान करणे.
- यासाठी विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील शैक्षणिक उपक्रमात तरतुदीसाठी एकात्मिक अभ्यासक्रमांची तरतूद करणे.
- वेळोवेळी राज्य शासन, केंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे जारी करण्यात आलेल्या सूचनेनुसार केवळ राज्यांतर्गत महाविद्यालये, संस्था आणि कॅम्पसबाहेरील केंद्रे उभारणे.
- विद्यापीठाची उद्दिष्टे आणि हेतूंसाठी आणि गुंतवणुकीसाठी राज्यातील किंवा राज्याबाहेरील ट्रस्टचे किंवा भेट स्वरूपात मिळालेल्या कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे अधिग्रहण, धारण आणि व्यवस्थापन करणे.
- या कायद्यातील तरतुदींनुसार वेळोवेळी विविध अभ्यासक्रमांसाठी शुल्क रचना ठरवणे.

- वेळोवेळी अशा शुल्काची आणि इतर देयकांची मागणी आणि प्राप्ती करणे.
- परस्पर स्वीकारार्ह अटी आणि शर्तींवर इतर संस्थांशी सहकार्य करणे.
- विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर नियामक संस्थांद्वारे निर्दिष्ट निकषांनुसार विद्यापीठातील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे वेतन, मोबदला आणि मानधन निश्चित करणे.
- शिक्षणेत्तर सेवांचे आयोजन करणे आणि स्वीकारणे.
- सभागृहे आणि वसतिगृहे स्थापणे आणि त्यांची देखभाल करणे.
- विद्यापीठाद्वारे देखभाल केली जात नसलेली सभागृहे, वसतिगृहे व विद्यार्थ्यांना राहण्यासाठीच्या  तर सोयींचे नियोजन, देखरेख आणि नियंत्रण करणे आणि अशा प्रकारची कोणतीही मान्यता रद्द करणे.
- विद्यापीठातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीचे नियमन आणि अंमलबजावणी करणे आणि तसे करण्यासाठी आवश्यक अनुशासनात्मक उपाययोजना करणे.
- विद्यापीठाच्या विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याणासाठी आवश्यक व्यवस्था करणे.
- विशिष्ट अटी आणि शर्तींच्या आधारावर विद्यापीठाच्या उद्दिष्टांशी समान उद्दिष्टे बाळगणाऱ्या देश किंवा विदेशातील कोणत्याही विद्यापीठ, प्राधिकारी किंवा सार्वजनिक, खाजगी संस्थेशी त्या उद्दिष्टांच्या संवर्धनासाठी सहकार्य करणे.
- विद्यापीठाद्वारे जारी करण्यात आलेल्या पुस्तकांसह संशोधन आणि तर कामांसंबंधी मजकुराची छपाई, पुनर्मुद्रण आणि प्रकाशनासाठी तरतूद करणे.
- विद्यापीठ अनुदान आयोग (खाजगी विद्यापीठांत मानकांची स्थापना आणि परिरक्षण) विनियम, २००३च्या तरतुदी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेले नियम व सूचनांचे अनुपालन आणि अंमलबजावणी करणे.
- विद्यापीठाचे उपरोक्त अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांबाबत राज्य शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशांचे पालन करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.
- विद्यापीठाच्या एक किंवा अनेक उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी आवश्यक, प्रासंगिक किंवा अनुकूल असतील अशा सर्व गोष्टी करणे.

# 3. ऑर्गेनोग्राम


अध्यक्ष/कुलपती
कुलगुरू
कुलसचिव
उपकुलसचिव
एआर जीएडी
एआर एचआर
एआर स्टोअर
एआर लीगल
एआर अकॅडमीक
बीओएस ए.सी.
पीआरओ
विद्यापीठ ग्रंथपाल
वसतिगृह/ रुग्णालय
अभियांत्रिकी विभाग
गार्डन कर्मचारी इस्टेट ऑफिसर
विद्याशाखा अधिष्ठाता
एचओआय
एचओडी
आयक्यूएसी संचालक
अक्रीडीटेशन
अकॅडमीक ऑडीट
रेंकिंग
आर ॲंड डी
आंतरराष्ट्रीय संबंध
माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट संबंध
मुख्य वित्त लेखाधिकारी
ए आर अकाउंट
ए आर ऑडीट
परीक्षा नियंत्रक
नावनोंदणी
परीक्षा
गोपनीय
स्टोअर
पीएच.डी. सेल
विद्यार्थीविकास/क्रिडा संचालक/एनएसएस/ एनसीसी

# 4. विद्यापीठाचे अधिकारी

विद्यापीठ अधिनियम क्र. २६, २०१९च्या कलम ११ (i) ते (vii) नुसार विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची नावे आणि पद खालीलप्रमाणे (तक्ता क्र. १).

तक्ता क्र. १: विद्यापीठाचे अधिकारी

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री अंकुशराव कदम | माननीय कुलपती |
| २ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | माननीय कुलगुरू |
| ३ | डॉ. हरिरंग शिंदे | डीन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखा |
| ४ | डॉ. रेखा शेळके | डीन, सामाजिक विज्ञान आणि मानविकी विद्याशाखा |
| ५ | डॉ. प्राप्ती देशमुख | डीन, मूलभूत आणि उपयोजित विज्ञान शाखा |
| ६ | डॉ. जोयिता चॅटर्जी | डीन, व्यवस्थापन आणि वाणिज्य विद्याशाखा |
| ७ | गुरू पार्वती दत्ता | डीन, परफॉर्मिंग आर्ट्स विद्याशाखा |
| ८ | डॉ. आशिष गाडेकर | कुलसचिव |
| ९ | श्रीमती प्रेरणा दळवी | उपनिबंधक |
| १० | श्री. भारत पेन्टेवार | मुख्य वित्त व लेखाधिकारी |
| ११ | कर्नल (डॉ.) प्रदीप कुमार | परीक्षा नियंत्रक |
| १२ | श्रीमती राजलक्ष्मी भोसले | व्यवस्थापक एच.आर विभाग |
| १३ | श्री. सुजीत मोरे | आयटी, विभाग प्रमुख |

# ५. विद्यापीठाचे पदाधिकारी

विद्यापीठ अधिनियम क्रं २६, २०१९च्या कलम २० नुसार विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांची नावे आणि पद खालीलप्रमाणे (तक्ता क्र. २ ते ५).

तक्ता क्र. २: विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे सदस्य

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री अंकुशराव कदम | अध्यक्ष आणि कुलपती |
| २ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | कुलगुरू |
| ३ | डॉ. पांडुरंग जाधव | सदस्य |
| ४ | प्रा. प्रताप बोराडे | सदस्य |
| ५ | डॉ. सुधीर कदम | सदस्य |
| ६ | डॉ. नितीन कदम | प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ-१ |
| ७ | श्री कमलकिशोर कदम | प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ-२ |
| ८ | श्री सुधीर कदम | आयटी तज्ज्ञ |
| ९ | राज्य सरकार नामनिर्देशित | |
| १० | राज्य सरकार नामनिर्देशित | |
| ११ | श्री भाऊसाहेब राजाळे | उद्योग प्रतिनिधी |
| १२ | श्री रणजित कक्कड | उद्योग प्रतिनिधी |
| १३ | डॉ. आशिष गाडेकर | सदस्य-सचिव |

तक्ता क्र. ३: विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | अध्यक्ष आणि कुलगुरू |
| २ | डॉ. पांडुरंग जाधव | सदस्य |
| ३ | प्रा. प्रताप बोराडे | सदस्य |
| ४ | डॉ. रेखा शेळके | सदस्य |
| ५ | डॉ. हरिरंग शिंदे | सदस्य |
| ६ | डॉ. शशांक दळवी | सदस्य |
| ७ | प्रा. सुनील पाटील | सदस्य |
| ८ | डॉ. प्राप्ती देशमुख | सदस्य |
| ९ | डॉ. अर्चना पांचे | सदस्य |
| १० | गुरू पार्वती दत्ता | सदस्य |
| ११ | डॉ. विजया मुसांडे | सदस्य |
| १२ | डॉ. आशिष गाडेकर | सदस्य-सचिव |

तक्ता क्र. ४: विद्यापीठाचे शैक्षणिक परिषद सदस्य

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | अध्यक्ष आणि कुलगुरू |
| २ | डॉ. हरिरंग शिंदे | सदस्य |
| ३ | डॉ. रेखा शेळके | सदस्य |
| ४ | डॉ. प्राप्ती देशमुख | सदस्य |
| ५ | कर्नल. डॉ. प्रदीप कुमार | सदस्य |
| ६ | गुरू पार्वती दत्ता | सदस्य |
| ७ | डॉ. संजय हरके | सदस्य |
| ८ | डॉ. आर. आर. देशपांडे | सदस्य |
| ९ | डॉ. विजया मुसांडे | सदस्य |
| १० | डॉ. सुनील पवार | सदस्य |
| ११ | डॉ. अभय कुलकर्णी | सदस्य |
| १२ | प्रा. फैजल शेख | सदस्य |
| १३ | डॉ. विनिता अरोळे | सदस्य |
| १४ | डॉ. सदानंद गुहे | सदस्य |
| १५ | श्रीमती शुभा महाजन | सदस्य |
| १६ | डॉ. परमिंदर कौर | सदस्य |
| १७ | डॉ. मुंजादास कदम | सदस्य |
| १८ | श्री. शिव कदम | सदस्य |
| १९ | डॉ. शर्वरी तामने | सदस्य |
| २० | श्री. बापू देशमुख | सदस्य |
| २१ | डॉ. रविंद्र देशमुख | सदस्य |
| २२ | श्री. सुनील पाटील | सदस्य |
| २३ | डॉ. एम. एम. हुंदेकर | सदस्य |
| २४ | डॉ. विजया प्रधान | सदस्य |
| २५ | डॉ. सोनल देशमुख | सदस्य |

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| २६ | डॉ. रश्मी जायभाये | सदस्य |
| २७ | श्री. निरंजन गोस्वामी (पद्म पुरस्कार पाप्त) | सदस्य |
| २८ | डॉ. बिष्णुप्रिया दत्त | सदस्य |
| २९ | डॉ. अनु गोखले | सदस्य |
| ३० | डॉ. दीलिप पोकले | सदस्य |
| ३१ | डॉ. भूमिका गुप्ता | सदस्य |
| ३२ | डॉ. विजया देशमुख | सदस्य |
| ३३ | डॉ. संतोष डोंगरे | सदस्य |
| ३४ | श्री. बैजू पाटील | सदस्य |
| ३५ | डॉ. कपिलेश्वर मिश्रा | सदस्य |
| ३६ | डॉ. सजी बेबी | सदस्य |
| ३७ | डॉ. रंजन गर्गे | सदस्य |
| ३८ | डॉ. बी. एन. पांडे | सदस्य |
| ३९ | डॉ. मनिषा राजेभोसले | सदस्य |
| ४० | प्रा. आय. सी. गुप्ता | सदस्य |
| ४१ | श्री. निक ओझा | सदस्य |
| ४२ | डॉ. गंगाधर निकम | सदस्य |
| ४३ | डॉ. सूर्यभान सनानसे | सदस्य |
| ४४ | श्री. गिरीश लाड | सदस्य |
| ४५ | डॉ. कृष्णमूर्ति व्ही. | सदस्य |
| ४६ | डॉ. बजरंग कोरडे | सदस्य |
| ४७ | डॉ. नचिकेत ठाकूर | सदस्य |
| ४८ | श्री. देबाशिष पॉल | सदस्य |
| ४९ | डॉ. आशिष गाडेकर | सदस्य-सचिव |

तक्ता क्र. ५: विद्यापीठाचे परीक्षा मंडळ सदस्य

| अनु. क्र. | विद्याशाखेचे नाव | नाव | विभाग/कॉलेज/इन्स्टिट्युट | पद |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | | कुलगुरू, एमजीएम विद्यापीठ. | अध्यक्ष |
| २ | **अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** | डॉ. विजया प्रधान | स्थापत्य अभियांत्रिकी | सदस्य |
| ३ | | डॉ. मुंजादास कदम | यांत्रिक अभियांत्रिकी | सदस्य |
| ४ | | श्री. बापू देशमुख | विद्युत अभियांत्रिकी | सदस्य |
| ५ | | डॉ. विजया मुसांडे | संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी | सदस्य |
| ६ | | डॉ. शर्वरी तामने | माहिती तंत्रज्ञान | सदस्य |
| ७ | | डॉ. सुनील पवार | इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी | सदस्य |
| ८ | | डॉ. सदानंद गुहे | रासायनिक अभियांत्रिकी | सदस्य |
| ९ | | श्री. सुनील पाटील | आर्किटेक्चर | सदस्य |
| १० | | डॉ. विनिता अरोळे | व्यावहारिक विज्ञान | सदस्य |
| ११ | | डॉ. सोनल देशमुख | मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स | सदस्य |
| १२ | **मूलभूत आणि उपयोजित विज्ञान** | डॉ. प्राप्ती देशमुख | डॉ. जी. वाय. पाथ्रीकर कॉलेज ऑफ सीएस अँड आयटी | सदस्य |
| १३ | | डॉ. संजय हरके | इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्स आणि तंत्रज्ञान | सदस्य |
| १४ | **व्यवस्थापन आणि वाणिज्य** | डॉ. पूजा देशमुख | व्यवस्थापन आणि संशोधन संस्था | सदस्य |
| १५ | | प्रा. अनिकेत जोशी | इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट | सदस्य |
| १६ | **सामाजिक विज्ञान आणि मानव्य विज्ञान** | डॉ. रेखा शेळके | पत्रकारिता आणि जनसंवाद महाविद्यालय | सदस्य |
| १७ | | श्रीमती शुभा महाजन | इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझायनिंग | सदस्य |
| १८ | | डॉ. रश्मी जायभाये | इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेस | सदस्य |
| १९ | | डॉ. वैशाली चौधरी | मानसशास्त्र विभाग | सदस्य |
| २० | | डॉ. बाळासाहेब सारटे | अर्थशास्त्र विभाग | सदस्य |
| २१ | **परफॉर्मिंग आर्ट्स** | गुरू पार्वती दत्ता | महागामी गुरुकुल | सदस्य |
| २२ | डॉ. वाल्मिक सरवदे | | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | मूल्यमापन तज्ञ |
| २३ | कर्नल. डॉ. प्रदीप कुमार | | सीओई, एमजीएम विद्यापीठ | सदस्य-सचिव |

# विद्यापीठाच्या समित्या

विद्यापीठ अधिनियम क्रं २६, २०१९च्या कलम २९ नुसार विद्यापीठाच्या समिती खालीलप्रमाणे (तक्ता क्र. ६ आणि ७).

तक्ता क्र. ६: विद्यापीठाची वित्त समिती

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे | अध्यक्ष आणि कुलगुरू |
| २ | डॉ. पांडुरंग जाधव | सदस्य |
| ३ | डॉ. सुधीर कदम | सदस्य |
| ४ | श्री. अशोक पाटील | सदस्य |
| ५ | ॲड. साहेबराव कदम | सदस्य |
| ६ | डॉ. हरिरंग शिंदे | सदस्य |
| ७ | श्री. वसंतरात साळुंके | सदस्य |
| ८ | श्री. भारत पेन्टेवार | सदस्य |

तक्ता क्र. ७ : विद्यापीठाची शुल्क निर्धारण समिती

| अनु. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | माननीय पंडितराव जाधव | अध्यक्ष (निवृत्त न्यायाधीश) |
| २ | प्रा. प्रताप बोराडे | सदस्य |
| ३ | श्री. अशोक पाटील | सदस्य |
| ४ | श्री. वसंतरात साळुंके | सदस्य |
| ५ | श्री. भारत पेन्टेवार | सदस्य |

# ६. शैक्षणिक कार्यक्रम

एमजीएम विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.२६, २०१९ अंतर्गत करण्यात आली असून, तंत्रशिक्षण विभागाच्या ०९ सप्टेंबर २०१९रोजीच्या अधिसूचना क्र. एसएफयु २०१८/जी. आर.७९/युनि.-४ नुसार विद्यापीठ कार्यान्वित झाले आहे. एमजीएम विद्यापीठ अधिनियम (महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.२६, २०१९)च्या कलम ४ नुसार एमजीएम विद्यापीठाला विविध विद्याशाखांतील शिक्षण पुरविण्यास तसेच संशोधनाला चालना देण्यास मान्यता मिळाली आहे. जसे, लिबरल आर्ट्स, मानव्य विद्या, सामाजिक शास्त्रे, जीव विज्ञान, बायोटेक्नॉलॉजी, नॅनो-सायन्सेस आणि व्यावसायिक अभ्याक्रम जसे अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवसाय व्यवस्थापन आणि वाणिज्य, अप्लाईड आणि क्रिएटिव्ह आर्ट्स, व्यावसायिक कौशल्ये, शिक्षण, मीडिया, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी आणि त्यांचा आंतरविद्याशाखीय अभ्यास. अशा वैविध्यपूर्ण विद्याशाखांतील अनेक अभ्यासक्रम विद्यापीठाद्वारे विकसित करून आपल्या विद्यार्थ्यांना शिकवले जातात.

हे अभ्यासक्रम आधीच अस्तित्वात असलेल्या संस्था/महाविद्यालयांकडून शिकवले जात होते, नंतर ते विद्यापीठाच्या अखत्यारीत आणण्यात आले. या महाविद्यालयांना आणि संस्थांना एमजीएम विद्यापीठ कार्यान्वित होण्यापूर्वीच AICTE/COA (लागू असलेली) ची मान्यता प्राप्त होती. वैधानिक परिषदांद्वारे एमजीएम विद्यापीठांतर्गत आलेल्या अभ्यासक्रमांना मिळालेल्या मंजुरीचा विस्तार करण्यात आला आहे (तक्ता क्र. १)

तक्ता क्र. १: शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी उपलब्ध अभ्यासक्रम

| विद्याशाखा | कॉलेज/विभागाचे नाव | पदविका /प्रमाणपत्र अभ्यासक्रम | पदवी अभ्यासक्रम | पदव्युत्तर अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| मूलभूत आणि उपयोजित विज्ञान | इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्स अँड टेक्नॉलॉजी | | | एम. एस्सी (बायोइन्फॉर्मेटिक्स) |
| व्यवस्थापन आणि वाणिज्य | इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च | | बीबीए | |
| | इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट | | बी. एस्सी (हॉटेल ऑपरेशन अँड केटरिंग सर्व्हिसेस) | |
| सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या | पत्रकारिता आणि जनसंवाद महाविद्यालय | | | एम. ए. (एमसीजे) विद स्पेशलायझेशन |
| | स्कूल ऑफ फोटोग्राफी | | बी. ए. (हॉन) फोटोग्राफी | |
| | स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स | डिप्लोमा इन फिल्म मेकिंग | बी. ए. (हॉन) फिल्म मेकिंग | |
| | कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स | | बीएफए (इंटेरियर डिझाईन) | |
| प्रायोगिक कला | महागामी गुरुकुल प्रायोगिक कला केंद्र | डिप्लोमा इन कथक डान्स (कला उदयन कथक) | बॅचलर ऑफ परफॉमिंग आर्ट्स (बीपीए) इन कथक डान्स (कला विद कथक) | |
| | | डिप्लोमा इन ओडिसी डान्स (कला उदयन ओडीसी) | बॅचलर ऑफ परफॉमिंग आर्ट्स (बीपीए) इन ओडिसी डान्स (कला विद ओडिसी) | |
| | | फाउंडेशन सर्टिफिकेट इन कथक डान्स | | |

# ७. विद्यापीठ प्रवेश

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये विविध पदवीपूर्व, पदव्युत्तर, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या:

| | नोंदणीकृत विद्यार्थी संख्या |
|---|---|
| पदवी अभ्यासक्रम : ०७ | १६० |
| पदव्युत्तर अभ्यासक्रम : ०२ | १९ |
| पदविका अभ्यासक्रम : ०३ | २६ |
| प्रमाणपत्र अभ्यासक्रम : ०१ | ०२ |
| **एकूण : १३** | **२०७** |

# ८. विद्यार्थी उपक्रम

- जेएनईसी आणि टेक महिंद्रा मेकर्स लॅब यांच्यातील इंडस्ट्री-इंटरेक्शन वाढविण्यासाठी टेक महिंद्राच्या एक्स्पर्ट टीमने ३ जानेवारी २०२० रोजी जेएनईसीला भेट दिली. मेकर्स लॅब हे ग्राहक, भागीदार कंपन्या, संशोधन संस्था, विद्यापीठे आणि स्टार्टअप यांच्यासह भविष्यवेधी सोल्युशन्स आणि सेवांच्या नवोन्मेषासाठीचे संशोधन आणि विकास केंद्र आहे.

- टीम सदस्य श्रीनिवास चेतलापल्ली (बिझनेस युनिट हेड), कु. कांचन भोंडे (प्रोडक्ट स्ट्रेटजी हेड), श्री. उमेश कड (अकॅडेमी आणि स्टार्टअप कॉलेबोरेशन हेड), श्री. आकाश डोळस (प्रोग्राम मॅनेजमेंट हेड) आणि श्री. राहुल मराठे (डिझाईन स्टुडिओ हेड) यांनी व्यवस्थापन, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), ऑगमेंटेड रिॲलिटी/व्हर्च्युअल रिॲलिटी, ५जी या भविष्यातील नेटवर्कसारख्या पुढच्या पिढीतील तंत्रज्ञानावर मेकर्स लॅबचा असलेला भर विशद केला. या एक्स्पर्ट टीमने विविध प्रकारचे प्रोब्लेम स्टेटमेंटही शेअर केले ज्यावर जेइनईसी विद्यार्थ्यांनी काम करायला सुरुवात केली.




- सीएसई विभाग, जेएनईसीद्वारे वाचनाच्या महत्त्वाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणण्यासाठी आणि डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे विचार त्यांच्या मनात रुजविण्यासाठी डॉ. कलाम यांच्या जयंतीदिनी १५ ऑक्टोबर २०१९ रोजी 'वाचन दिन' साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या पुस्तकांचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच त्यांच्या पुस्तकांचे सादरीकरणही करण्यात आले. त्यानंतर नाट्य सादरीकरण आणि रोल प्लेही करण्यात आले.

- संस्कृती जतन आणि संवर्धनाबरोबरच तिला संपूर्ण जगभरात पोहोचविण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे भाषा. दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० या आंतरराष्ट्रीय मातृभाषादिनी जेएनईसीच्या सीएसई विभागातर्फे 'भाषामृत' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आपल्या देशातील भाषावैविध्य अधोरेखित करणे आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्य समजून घेणे हे होते.



- कोडिंग हब या जेएनईसीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसच्या उपक्रमांतर्गत ९ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०१९ या महिनाभरात C/C++/JAVA या प्रोग्रामिंग लॅन्ग्वेजेसवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात आले. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसने प्राध्यापक कु. विजया अहिरे, श्री. गिरीश अग्रवाल, कु. व्ही.एस. हणमंते, कु. चैताली पाटील, श्री. वाय. आर. तायडे, कु. श्वेता पाटील यांच्या टीमसह उपक्रमाचे संयोजन केले. या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटसाठी आवश्यक कोडिंग कौशल्ये विकसित करणे हे

होते. एकूण १०० विद्यार्थ्यांनी हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केले.

- जेएनईसीच्या आयटी विभागाद्वारे दिनांक २ ते ४ जुलै २०१९ दरम्यान 'ब्लॉकचेन फंडामेंटल्स' वर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे वक्ते श्री. गौरव सोमवंशी, फ्युचर लीडर, ब्रिटिश कौन्सिल आणि श्री. गणेश अनंतवार, असोसिएट, जे.पी. मॉर्गन हे होते. या कार्यशाळेत आणि त्यांचे व्यावहारिक उपयोजन याविषयी ओपन सोर्स व्हेरिलॉग सॉफ्टवेअरच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.



डॉ. बी.ए.टी.यू., लोणेरेशी संलग्न विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले होते.

- जेएनईसीच्या आयटी विभागाद्वारे २३ सप्टेंबर २०१९ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ISRO, NRSC नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर येथे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचे उद्दिष्ट रिमोट सेन्सिंग आणि जीआयएसमधील संशोधनाच्या संधी समजून घेणे हे होते. यावेळी NRSC च्या प्रमुख डॉ. पद्माराणी यांनी ISRO चे मिशन, विविध प्रकल्प आणि डॉ. विक्रम साराभाई, डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारख्या भारताच्या महान वैज्ञानिकांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.
- जेएनईसी आयटीच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी १९ ऑक्टोबर, २०१९ रोजी 'स्टॅटिस्टिक्स' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्राध्यापक, डॉ. ओमप्रकाश जाधव यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी स्टॅटिस्टिक्सची मूलभूत तत्त्वे, प्रोबॅबिलिटी डिस्ट्रिब्युशन, हायपोथेसिस, टेस्टिंग ऑफ हायपोथेसिस यांसारख्या गोष्टी समजून घेतल्या.
- दिनांक २१ फेब्रुवारी ते ०३ मार्च २०२० दरम्यान जेएनईसीच्या ईसीटी विभागातर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'VLSI डिजिटल सिस्टम डिझाईन थ्रू व्हेरिलॉग एचडीएल' या विषयावर डॉ. नूर मोहम्मदन यांच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना VLSI फंडामेंटल्स

